वादीतर्फे साक्षीदार क्र.२

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. पी.एल. नरहरे यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. माझे इंजिनिअरिंग १९९७ साली लातूर येथे पूर्ण झाले आहे. मी लातूर येथे राहून शिक्षण घेतलेले आहे. मी २००२ पासून लातूर येथेच राहतो. मी रस्त्याची कामे घेतो. केवळबाई यांचे पूर्ण नाव मला माहीत नाही. मनकर्णाबाईचे पूर्ण नाव मनकर्णाबाई सोमनाथ पाटील असे आहे. केवळबाई ह्या राणी अंकुलगा येथे राहत नव्हत्या. त्या सध्या मयत आहेत. मनकर्णाबाई व केवळबाई हे मौजे राणी अंकुलगा येथे राहत नाही, हा मजकूर मी सांगितल्याप्रमाणे वकीलांनी माझ्या शपथपत्रात नमूद केलेला आहे. केवळबाई यांना माझ्या माहितीप्रमाणे अपत्य नाहीत. केवळबाईच्या नवऱ्याबाबत मला माहिती नाही. रामण्णा मल्लेशे यांना व्यंकट व अंतेश्वर असे दोन मुले आहेत. अप्पाराव यांना दोन मुले व एक मुलगी आहे.

२. माझ्या आईचे नाव गजराबाई मनोहर मल्लेशे आहे. तिचे वय ७२ असून ती बरी आहे, परंतु सध्या आजारी असते. गजराबाईच्या नावे गट क्र.१२४ क्षेत्र ६२ आर आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, माझी आई गजराबाईच्या नावे निश्चीतपणे किती जमीन आहे व कोणत्या गटात आहे हे मला माहीत नाही. अप्पाराव भिमराव मल्लेशे यांच्या नावे गट क्र.१२४ क्षेत्र ७३ आर जमीन होती. गट क्र.१२४ मधील ७३ आर जमीन आज रोजी वादी संग्राम यांच्या नावे आहे. रामण्णा मल्लेशे यांना आमच्या गावात कुठल्या गटात व किती जमीन आहे याबाबत मला माहीत नाही. आमच्या गावात गट क्र.१२४, १२५, १२६ मधून कॅनॉल गेलेला आहे. सदर कॅनॉल पुर्व-पश्चीम असा आहे. गट क्र.१२४ हा गट क्र.१२५ च्या कोणत्या दिशेला आहे हे मी सांगू शकत नाही. माझ्या गट क्र.१२४ च्या पुर्व दिशेला गट क्र.१२५ आहे व गट क्र.१२६ उत्तरेस आहे. गट क्र.१२४, १२५ व १२६ चा ७/१२ उतारा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदर गटातील जमिनी कोणाच्या नावे आहे हे मला माहिती नाही. गट क्र.१२६ मधील जमीन प्रतिवादीच्या ताब्यात आहे. गट क्र.१२५ मधील जमीन कोणाच्या ताब्यात आहे हे मला माहिती नाही. गट क्र.१२४ मधील जमीन आमच्या ताब्यात आहे. संग्राम व अंतेश्वर यांच्यामध्ये माझ्यासमक्ष जमिनीबाबत कोणताही वाद झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे वडील अप्पाराव यांनी अंतेश्वर, व्यंकट, केवळबाई व मनकार्णाबाई यांना जबरदस्तीने जमिनीतून हाकलून देऊन अप्पाराव व त्यांचे वारसदार वादी यांनी जमिनीवर ताबा केल्याचे शपथपत्रात नमूद आहे, परंतु सदरचा ताबा माझ्यासमक्ष केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरनमूद ताब्याबाबतचा मजकूर हा मी शपथपत्रात संग्राम यांच्या सांगण्यावरुन नमूद केला आहे. मला गावातील लोकांकडून म्हणजेच राम मल्लेशे, विजय गुरूनाथ मल्लेशे यांच्याकडून समजला आहे.

३. अप्पाराव भिमराव मल्लेशे यांनी कोणाकडून जमीन खरेदी केली होती याबाबत मला माहिती नाही. (साक्षीदाराने दोन वेळा अप्पाराव यांनी कोणाकडून जमीन खरेदी केली हे माहीत नाही असे सांगितले. परंतु साक्षीदाराने पुन्हा सांगितले की, अप्पाराव यांनी रामण्णाकडून जमीन खरेदी केली आहे.) अप्पारावने किती जमीन व कुठल्या गटातील जमीन खरेदी केली होती याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, अप्पारावने खरेदी केलेली जमीन वादीला मिळावी याकरीता मला साक्ष देण्याकरीता बोलावण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर संग्रामच्या सांगण्यावरुन नमूद केला आहे. हे म्हणणे

खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by
BHOSALE VRINDA
DHANANJAY
Date: 2025.10.29
10:51:48 +0530

दि.२८/१०/२०२५

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.